|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

**निवडणूक शाखा**

# जाहीर निवेदन

आपणा सर्वांना ज्ञात आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ नुसार विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यासमंडळाचे विभागप्रमुख या प्राधिकरणांच्या २०२२-२०२७ या पंचवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित होऊन उद्या दि.८ जानेवारी,२०२३ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

वर नमूद मतदान प्रक्रियेसंबंधी मतदान कसे करावे ? या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सूचना विद्यापीठाने विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) प्रसिध्द केलेल्या आहेत. मतदान प्रक्रियेबाबत महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले एकरूप परिनियम क्र.१/२०१७ दि.१७ मे,२०१७ मधील तरतुदींनुसार व त्याअनुषंगाने विद्यापीठाने वेळोवेळी २०२२ मधील विद्यापीठ प्राधिकरण निवडणूकांसाठी जाहीर केलेल्या सूचना / निदेशाप्रमाणे मतदान करावयाचे आहे. याची सर्व संबंधितांनी खबरदारी घ्यावी.

विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या सूचना व वर नमूद परिनियमाव्यतिरिक्त मतदान कसे करावे या बाबत विद्यापीठाने कोणत्याही प्रसार/समाज माध्यमाव्दारे (Social Media) चित्रफित निर्गमित केलेली नाही याची सर्व संबंधित मतदार व उमेदवारांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ * जळगाव-४२५००१ *

**(डॉ. विनोद प्र. पाटील)**
**कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

स्थळ :- जळगाव
जा.क्र. : कबचौउमवि/२/निवडणूक/०८/२०२३
दिनांक : ०७/०१/२०२३

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. ०२५७ २२५७३४८ Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone No. : 0257 2257348 Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : election2022@nmu.ac.in